# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : ९
## सभावृत्तांत

दिनांक : ०३/२/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०३/२/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग - सभापती
२. मा.काळूराम मारुती पवार
३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
४. मा.साबळे जगन्नाथ दगडू
५. मा.उत्तम मुक्ताजी हिरवे
६. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

याशिवाय मा.कारचे-सहा.आयुक्त,मा.चव्हाण-अति.शहर अभियंता,मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.चाकणकर-उपनगरसचिव,मा.जाधव-कार्य.अभियंता,मा.लडकत-प्र.कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमती प्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक :- ३) प्र.क्र.३७ चिंचवड स्टेशन येथे आण्णासाहेब मगर नगर झोपडपट्टीमध्ये दुमजली संडास ब्लॉक बांधणेबाबत - मा.काळूराम पवार, मा.जगन्नाथ साबळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ४) प्र.क्र.३७ चिंचवड स्टेशन येथे इंदिरानगर झोपडपट्टीमध्ये दुमजली संडास ब्लॉक बांधणेबाबत - मा.काळूराम पवार, मा.जगन्नाथ साबळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ५) वॉर्ड क्र.२५ बालाजीनगर झोपडपट्टीत प्राथमिक शाळा बांधणेबाबत - मा.बाळासाहेब भुंबे, मा.जगन्नाथ साबळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ६) से.क्र.२२ मध्ये आझाद चौक ते रुपीनगर चौक मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे व फुटपाथ करणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.उत्तम हिरवे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ७) से.क्र.२२ मध्ये अंकुश चौक ते आझाद चौक मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे व फुटपाथ बांधणेबाबत - मा.तानाजी खाडे, मा.उत्तम हिरवे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ८) मा.झो.नि.पु. समिती सभा अभ्यास दौरा खर्चास मान्यता देणेबाबत - मा.उत्तम हिरवे, मा.काळूराम पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :- ९) झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये अपात्र लोकांना पात्र करणेबाबत - मा.जगन्नाथ साबळे, मा.काळूराम पवार यांचा प्रस्ताव...

---------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.काळूराम पवार

बुधवार दिनांक १०/०२/२०१० रोजी दुपारी ३.१५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती :- बुधवार दि.१०/०२/२०१० रोजी दुपारी ३:१५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

----------

(आदियाल (शीख)शोभा गुरुमितसिंग)
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## मा. झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती

### कार्यपत्रिका क्रमांक : ९
### सभावृत्तांत
### (दिनांक ०३/०२/२०१० ची तहकुब सभा)

दिनांक : १०/२/२०१० वेळ : दुपारी ३.१५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समितीची दिनांक ०३/०२/२०१० ची तहकुब सभा बुधवार दिनांक १०/२/२०१० रोजी दुपारी ३.१५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग - सभापती
२. मा.काळूराम पवार
३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
४. मा.साबळे जगन्नाथ दगडु
५. मा.उत्तम मुक्ताजी हिरवे
६. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
७. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

याशिवाय मा.कारचे-सहा.आयुक्त,मा.चाकणकर- उप नगरसचिव,मा.लडकत - प्र.कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - १
दिनांक- १०.२.२०१० विभाग - झो.नि.पु.स्थापत्य
सुचक- मा.काळुराम पवार अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/४९/१०दि.२८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वॉर्ड क्र. ६८ मधील बौध्दनगर झोपडपट्टीमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी र.रु.३६,३२,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - २
दिनांक- १०.२.२०१० विभाग - झो.नि.पु.स्थापत्य
सुचक- मा.काळुराम पवार अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/५०/१०दि.२८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

प्रभाग क्र. ८८ मधील आण्णाभाउ साठेनगर झोपडपट्टीमध्ये कॉंक्रीट पेव्हींग ब्लॉक बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी र.रु.३२,७४,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - ३
दिनांक- १०.२.२०१०
सुचक- मा.काळुराम पवार अनुमोदक - मा.जगन्नाथ साबळे
संदर्भ - मा.काळुराम पवार, मा.जगन्नाथ साबळे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.३७ चिंचवड स्टेशन येथील अण्णासाहेब मगर नगर झोपडपट्टीमध्ये जुने संडास ब्लॉक पाडून त्याठिकाणी नव्याने दुमजली संडास ब्लॉक 'पे ॲण्ड युज' या तत्वांवर करण्यासाठी र.रु.४०,००,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक - ४
दिनांक- १०.२.२०१०
सुचक- मा.काळुराम पवार अनुमोदक - मा.जगन्नाथ साबळे
संदर्भ - मा.काळुराम पवार, मा.जगन्नाथ साबळे यांचा प्रस्ताव...

प्रभाग क्र.३७ चिंचवड स्टेशन येथील इंदीरानगर झोपडपट्टीमध्ये जुने संडास ब्लॉक पाडून त्याठिकाणी नव्याने दुमजली संडास ब्लॉक 'पे ॲण्ड युज' या तत्वांवर करण्यासाठी र.रु.४०,००,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक - ५
दिनांक- १०.२.२०१०
सुचक- मा.बाळासाहेब भुंबे अनुमोदक - मा.जगन्नाथ साबळे
संदर्भ - मा.बाळासाहेब भुंबे,मा.जगन्नाथ साबळे यांचा प्रस्ताव...

वॉर्ड क्र.२५ बालाजीनगर झोपडपट्टीत प्राथमिक शाळा बांधणे कामासाठी र.रु.५०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ६
दिनांक- १०.२.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.उत्तम हिरवे
संदर्भ - मा.तानाजी खाडे,मा.उत्तम हिरवे यांचा प्रस्ताव...

सेक्टर क्र.२२ मध्ये आझाद चौक ते रुपीनगर चौक मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे कामास र.रु.४५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ७
दिनांक- १०.२.२०१०
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.उत्तम हिरवे
संदर्भ - मा.तानाजी खाडे,मा.उत्तम हिरवे यांचा प्रस्ताव...

सेक्टर क्र.२२ मध्ये अंकुश चौक ते आझाद चौक मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे व फुटपाथ बांधणे काम करणेसाठी र.रु.४५,००,०००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - ८
दिनांक- १०.२.२०१०
सुचक- मा.उत्तम हिरवे अनुमोदक - मा.काळूराम पवार
संदर्भ - मा.उत्तम हिरवे,मा.काळूराम पवार यांचा प्रस्ताव...

महापालिकेचे विविध झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प सुरु आहेत. त्यात काही सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. देशामध्ये केरळ राज्यात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे कामकाज चांगले आहे. मा.झो.नि.पु. समिती सदस्यांची शिष्टमंडळाकडून सदर प्रकल्पांची पाहणी करणे व त्याकामी होणारा प्रवास खर्च हा सभाशाखेकडील अंदाजपत्रक अ.क्र.१० "मा.विशेष समिती प्रवास खर्च" चे तरतूदीमधून खर्ची टाकणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ९
दिनांक- १०.२.२०१०
सुचक- मा.जगन्नाथ साबळे अनुमोदक - मा.काळूराम पवार
संदर्भ - मा.जगन्नाथ साबळे,मा.काळूराम पवार यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने झोपडपट्टी वासियांचे पुनर्वसन करण्यात येत असून या ठिकाणी बरेचसे झोपडपट्टीधारक अपात्र असल्यामुळे ते बऱ्याच दिवस झोपडपट्टीमध्ये रहात असून त्यांच्याकडे शासनाने ठरवलेल्या नियमानुसार व महापालिकेच्या धोरणांनुसार पात्र होण्याकरिता पुरावे नाहीत पण ते झोपडपट्टीमध्ये

राहतात. पुनर्वसन प्रकल्पामध्ये पात्र झोपडपट्टीधारकांस र.रु.३४,०००/- आकारली जाते. तसेच अपात्र झोपडपट्टीधारकास दुप्पट रक्कम आकारुन त्यांना सुद्धा पात्र समजणेत येऊन त्या अपात्र झोपडपट्टीधारकांना पुनर्वसन प्रकल्पात सामावून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(आदियाल (शीख)शोभा गुरुमितसिंग)
सभापती
झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि
समाज कल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/०९/कावि/२७०/२०१०
दिनांक :- ११/०२/२०१०

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.